## <u>कोष्टक १</u>

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील साखर उद्योगाची प्रगती

| वर्ष | कारखान्यांची संख्या | साखर उत्पादन (लाख टन) |
| --- | --- | --- |
| १९३०-३१ | २९ | ११.२ |
| १९३५-३६ | १३५ | ०९.३ |
| १९४०-४१ | १४८ | ११.१ |
| १९४५-४६ | १४५ | ०९.६ |

संदर्भ : को-ऑपरेटिव्ह शुगर, मे, १९८३

वरील कोष्टकावरून भारत सरकारने (त्यावेळच्या इंग्रज सरकारने) साखर उद्योगाला संरक्षण दिल्यानंतर कारखान्यांच्या संख्येत व उत्पादनात जलद वाढ झालेली दिसून येते. १९३७ च्या कराराचा कारखान्याच्या संख्येवर कसा परिणाम झाला ते ही या कोष्टकावरून दिसून येते. तात्पर्य स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील साखर उद्योगाच्या विकासात अनेक अडथळे आले.

### <u>उत्तर प्रदेश व बिहार राज्यात केंद्रीकरण</u>

कोणत्याही उद्योगाचे स्थाननियीकरण त्या उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल व अन्य सुविधांवर अवलंबून असते. यामुळेच भारतातील साखर उद्योगाचा विकास स्वातंत्र्यपूर्व काळात प्रामुख्याने उत्तर प्रदेश व बिहार राज्यात झाला. या राज्यात भारतातील साखरेच्या एकंदर उत्पादनापैकी ८५ पैकी टक्के उत्पादन होत असे.

---------

[illegible]

क) स्वातंत्र्योत्तर काळ

१९५६ च्या औद्योगिक धोरणात भारतातील साखर उद्योगाचा समावेश तिसऱ्या सूचीत करण्यात आला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक नियोजनात साखर उद्योगाला सरकारचा पाठिंबा मिळाला. १९६४ साली भारतातील साखर उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी ` सेन कमिशन ` नेमण्यात आले. या कमिशनने साखर उद्योगाच्या विकासासाठी सहकाराची शिफारस केली.[४] स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील साखर उद्योगाच्या विकासाचा आढावा पुढील कोष्टकाच्या आधारे घेता येईल.

कोष्टक २

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील साखर उद्योगाची प्रगती

| वर्ष | कारखान्यांची संख्या | साखर उत्पादन (लाख टन) |
|---|---|---|
| १९५०-५१ | १३८ | ११.२ |
| १९५५-५६ | १४३ | १८.२ |
| १९६०-६१ | १७४ | ३०.५ |
| १९६५-६६ | २०० | ३५.२ |
| १९७०-७१ | २१६ | ३७.४ |
| १९७५-७६ | २५३ | ४२.६ |
| १९७६-७७ | २७१ | ४८.४ |
| १९७७-७८ | २८६ | ६४.६ |
| १९७८-७९ | २९९ | ५८.४ |

-------

४) Gokhale Institute of Politics and Economics : Writings and Speeches of Professor D.R. Gadgil on Co-operation, 1975,p. 278.

कोष्टक १ (पुढे चालू...)

| वर्ष | कारखान्यांची संख्या | साखर उत्पादन (लाख टन) |
|---|---|---|
| १९७९-८० | २९९ | ३८.६ |
| १९८०-८१ | ३१४ | ५१.७ |
| १९८१-८२ | ३१९ | ८४.४ |
| १९८२-८३ | ३२० | ८२.३ |
| १९८३-८४ | ३२५ | ५९.२ |
| १९८४-८५ | ३५६ | ६२.० |

संदर्भ : इंडियन शुगर मिल्स असोशिएशन, इंडियन शुगर, एप्रिल, १९८५

या कोष्टकावरून असे स्पष्ट होते की,

१) स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील साखर कारखान्यांच्या संख्येत अडीच पटीपेक्षा अधिक वाढ झाली.

२) तसेच या कालावधीत भारतातील साखर उत्पादनात ४६३ टक्के वाढ झाली.

३) मात्र साखरेच्या उत्पादन वाढीत तीव्र स्वरूपाचे चढउतार दिसून येतात. याचे मुख्य कारण ऊसाच्या उत्पादनातील चढउतार हेच म्हणावे लागेल. उदा. १९६८-६९ च्या दुष्काळामुळे भारतामध्ये पुरेसे ऊस उत्पादन झाले नाही. अशीच परिस्थिती १९७८-७९ व १९७९-८० मध्ये निर्माण झाली. याचा परिणाम साखर उत्पादनावर झाला त्यानंतर साखरेचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे साखर उत्पादनात वाढीची प्रवृत्ती निर्माण झाली. १९८१-८२ मध्ये साखर उत्पादनाचा उच्चांक गाठण्यात आला.

४) १९५०-५१ ते १९६०-६१ या दशकात भारतातील साखर कारखान्यांच्या संख्येत २६.०८ टक्के वाढ झाली. १९६१-६२ व १९७१-७२ या दशकासाठी अनुक्रमे २४.१३ टक्के व ४५.३७ टक्के वाढ झाली. तर १९८०-८१ ते १९८४-८५ पर्यन्त साखर कारखान्यांची संख्या २३.३७ टक्क्यांनी वाढली. मात्र साखर कारखान्यांच्या संख्येत ज्या प्रमाणात वाढ झाली त्याच प्रमाणात साखर उत्पादनातील वाढ नेहमीच साध्य झाली नाही.

१९५०-५१ ते १९६०-६१ या दशकात साखर उत्पादन वाढीचा दर (१७२.३२ टक्के) कारखान्याच्या संख्या वाढीच्या दरापेक्षा (२६.०८ टक्के) जास्त होता. १९६१-७१ या दशकात साखर उत्पादनवाढीचा वेग (२२.६२ टक्के) साखर कारखान्यांच्या संख्यात्मक वाढीपेक्षा (२४.६४ टक्के) कमी होता. म्हणजेच वाढत्या कारखान्यांच्या प्रमाणात उत्पादन वाढलेले दिसून येत नाही. सरकारच्या सतत बदलत्या धोरणामुळे तसेच नैसर्गिक परिस्थितीमुळे या उद्योगापुढे अनेक समस्याही निर्माण झाल्याचे आढळते. ऊसाचा नियमित पुरवठा, गूळ व खांडसरी धंद्यापासून स्पर्धा व कारखान्यांच्या नूतनीकरणाची गरज इत्यादी समस्या या उद्योगापुढे आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतातील अनेक राज्यात साखर कारखाने सुरू झाले. विशेषत: महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व कर्नाटक या राज्यात या उद्योगाचा विकास झाला यामुळे उत्तर प्रदेश व बिहार राज्यांचा साखरेच्या उत्पादनातील वाटा ६० टक्के झाला. स्वातंत्र्यपूर्व काळाच्या तुलनेत स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील साखर उद्योगाची जास्त प्रगती झाली असे म्हणता येईल.

<u>भारताच्या अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाचे स्थान</u> :

भारतात सुती कापड उद्योगाच्या खालोखाल साखर उद्योग महत्वाचा मानला जातो. भारतात जानेवारी, १९८७ मध्ये ३६२ साखर कारखाने होते. त्यापैकी खाजगी क्षेत्रात १०५, सहकारी क्षेत्रात १९१ व सार्वजनिक क्षेत्रात ६६ कारखाने होते.[५]

----------

५. गोडवा, जानेवारी, १९८७, पृ.११.

राष्ट्रीय उत्पादन वाढविण्यात, रोजगार उपलब्ध करून देण्यात व परकीय चलन मिळवून देण्यात भारतातील साखर उद्योगाने मानाचे स्थान मिळविलेले आहे.

जगातील साखर उत्पादक देशात भारताचा चौथा क्रमांक लागतो. या उद्योगामुळे साधारणपणे ३.२५ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होतो. तर ऊस उत्पादनामुळे साधारणपणे २.५ कोटी शेतकऱ्यांना अप्रत्यक्ष रोजगार मिळतो.[६] तसेच या उद्योगामुळे केंद्र सरकारला अबकारी करांपासून उत्पन्न मिळते. १९५७ पासून भारतातून साखरेची निर्यात सुरू झाली, या उद्योगापासून सरकारला मिळालेले अबकारी करापासूनचे उत्पन्न व साखरेची निर्यात याबाबतचा अधिक तपशील कोष्टक ३ व ४ मध्ये दिलेला आहे.

<u>कोष्टक ३</u>

साखर उद्योगापासून मिळालेला अबकारी कर

| वर्ष | अबकारी कर ( लाख रुपये ) |
|---|---|
| १९५०-५१ | ६५६ |
| १९५१-५२ | ८४७ |
| १९५२-५३ | १०१७ |
| १९५३-५४ | १३४१ |
| १९५४-५५ | ८०७ |
| १९५५-५६ | १८४४ |
| १९५६-५७ | २०७५ |
| १९५७-५८ | ४२५१ |
| १९५८-५९ | ६०२६ |

----------

६. Dutt and Sundharam : Indian Economy, S. Chand and Company Ltd., New Delhi, 1977, p.494.

कोष्टक ३ (पुढे चालू...)

| वर्ष | अबकारी कर (लाख रुपये) |
|---|---|
| १९५९-६० | ५९७५ |
| १९६०-६१ | ५४८२ |
| १९६१-६२ | ५४८२ |
| १९६२-६३ | ७४९८ |
| १९६३-६४ | ६६१७ |
| १९६४-६५ | ६५१८ |
| १९६५-६६ | ७५०० |
| १९६६-६७ | ११०१२ |
| १९६७-६८ | ७३९६ |
| १९६८-६९ | ६६९५ |
| १९६९-७० | १०२१५ |
| १९७०-७१ | १३७९८ |
| १९७१-७२ | १६३२० |
| १९७२-७३ | १७५४० |
| १९७३-७४ | १९५४७ |
| १९७४-७५ | १९०५० |
| १९७५-७६ | २२४९५ |
| १९७६-७७ | २२७४५ |
| १९७७-७८ | २०१७४ |

संदर्भ : भारतीय शुगर, १९८३-८४, डिरेक्टरी पृ.५४.

साखर उद्योगापासून सरकारला कर रूपाने उत्पन्न मिळते. केंद्र व राज्य सरकारांनी ऊसावर व साखरेवर ऊस अधिभार व खरेदी कर बसविलेले आहेत. हे कर प्रत्येक राज्यांतून वेगवेगळे आहेत. १९३४ पासून केंद्र सरकारने साखर उद्योगावर अबकारी कर बसविलेला आहे. अबकारी करामुळे सरकारला मिळणा-या उत्पन्नात वाढ होत आहे असे कोष्टक ३ वरून दिसून येते.

<u>कोष्टक ४</u>

भारताने केलेली साखर निर्यात

| वर्ष | निर्यात (लाख टन) |
|---|---|
| १९५७ | १.४७ |
| १९५८ | ०.५० |
| १९५९ | ०.१६ |
| १९६० | ०.१८ |
| १९६१ | २.६८ |
| १९६२ | ३.७३ |
| १९६३ | ४.७९ |
| १९६४ | २.३४ |
| १९६५ | २.६७ |
| १९६६ | ४.४१ |
| १९६७ | २.१७ |
| १९६८ | ०.९९ |
| १९६९ | ०.९४ |
| १९७० | ३.१८ |
| १९७१ | ३.३२ |
| १९७२ | ०.९९ |

कोष्टक ४ (पुढे चालू....)

| वर्ष | निर्यात (लाख टन) |
|---|---|
| १९७३ | २.४९ |
| १९७४ | ४.४३ |
| १९७५ | ९.६६ |
| १९७६ | ८.४३ |
| १९७७ | २.५४ |
| १९७८ | ६.३५ |
| १९७९ | ६.५६ |
| १९८० | ०.६४ |
| १९८१ | ०.९८ |
| १९८२ | ४.६६ |
| १९८३ | ७.२४ |

संदर्भ : भारतीय शुगर, १९८३-८४,
डिरेक्टरी, पृ. ३२.

## महाराष्ट्रातील साखर उद्योग :

महाराष्ट्रातील साखर उद्योग व सहकारी साखर कारखाने यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. भारताच्या साखर उद्योगात महाराष्ट्र राज्य अग्रेसर असल्याचे श्रेय मुख्यत्वे सहकारी साखर कारखान्यांना द्यावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील साखर उद्योगाची राज्यनिहाय प्रगती महाराष्ट्राच्या साखर उद्योगावर अधिक प्रकाश टाकू शकेल. कोष्टक ५ मध्ये भारतातील साखर उद्योगाची राज्यनिहाय विभागणी दिलेली आहे.

## कोष्टक ५

### भारतातील साखर उद्योगाची राज्यनिहाय विभागणी

| राज्य | १९५०-५१ | | १९६०-६१ | | १९७०-७१ | | १९७१-७२ | | १९८३-८४ * | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | सहकारी | एकूण | सहकारी |
| आंध्र प्रदेश | ८ | १ | ११ | २ | १८ | ८ | १७ | ७ | ३१ | १७ |
| आसाम | - | - | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ |
| बिहार | २९ | - | २८ | - | २७ | १ | २६ | २ | २८ | - |
| गुजराथ | - | - | २ | २ | ७ | ७ | ८ | ८ | १२ | १२ |
| हरियाणा | १ | - | ३ | २ | ३ | २ | - | - | ५ | ४ |
| कर्नाटक | ४ | - | ८ | ३ | ११ | ६ | १४ | ६ | २४ | १३ |
| केरळ | १ | - | १ | - | ३ | २ | ३ | २ | २ | १ |
| मध्य प्रदेश | ५ | - | ५ | - | ५ | - | ६ | १ | ८ | ३ |
| महाराष्ट्र | १४ | १ | २७ | १४ | ४१ | ३० | ४५ | ३५ | ७८ | ४७ |
| ओरिसा | १ | - | १ | - | २ | १ | २ | १ | ३ | २ |
| पंजाब | २ | - | ३ | १ | ६ | ४ | ६ | ४ | ८ | ४ |
| राजस्थान | २ | - | २ | - | ३ | १ | ३ | १ | ३ | १ |
| तामिळनाडू | ४ | - | ८ | ३ | ५ | ६ | - | - | २३ | ११ |
| उत्तर प्रदेश | ६६ | - | ७२ | २ | ७१ | ४ | ७५ | ५ | ९२ | २१ |
| प. बंगाल | १ | - | २ | - | १ | - | १ | - | २ | - |
| गोवा | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पांडेचरी | - | - | १ | - | १ | १ | १ | १ | २ | १ |
| नागालँड | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण : | १३८ | २ | १७४ | ३० | २१३ | ७३ | २२९ | ८४ | ३२४ | १६० |

संदर्भ : The Maharashtra Co-operative Quarterly, 1977-1981-82.

* इंडियन शुगर मिल्स असोशिएशन, इंडियन शुगर, एप्रिल, १९८५.

या कोष्टकावरून असे आढळून येते की, १९६०-६१ मध्ये भारतातील एकूण साखर कारखान्यांपैकी महाराष्ट्रात १५.५१ टक्के साखर कारखाने होते. तर १९८३-८४ मध्ये महाराष्ट्र राज्याचा एकंदर साखर कारखान्यातील वाटा २१.९१ टक्के झाला. याच वर्षासाठी भारतातील एकंदर सहकारी साखर कारखान्यात महाराष्ट्राचा सहभाग अनुक्रमे ४६.६६ टक्के व ४१.८७ टक्के इतका होता. महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा विकास सहकारी क्षेत्रातच जास्त झाला आहे. १९५०-५१ मध्ये महाराष्ट्रातील १४ साखर कारखान्यांपैकी केवळ १ कारखाना सहकारी क्षेत्रात होता. १९८३-८४ व १९८४-८५ चे चित्र एकदम उलटे आहे. १९८३-८४ मध्ये ७८ कारखान्यांपैकी ६७ कारखाने व १९८४-८५ मध्ये ८५ कारखान्यांपैकी ७५ कारखाने सहकारी क्षेत्रात होते. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या प्रवर्तनाचे श्रेय अहमदनगर जिल्ह्यातील लोणी या गावी १९५० मध्ये सुरू झालेल्या सहकारी साखर कारखान्याला द्यावे लागेल.[७] कारण या कारखान्याच्या यशामुळे सहकाराचे एक संघटनपध्दती म्हणून मिळणारे फायदे स्पष्ट झाले. १९६२ पासून खाजगी क्षेत्रातले कारखाने सहकारी क्षेत्रात आणण्याची सूचना करण्यात येऊ लागली. हळूहळू महाराष्ट्रातील साखर उद्योग सहकारी क्षेत्रात भरभराटीला आला. १९५० पूर्वी सहकारी तत्वावर साखर कारखाना काढण्याचा प्रयत्न कै. लालभाई समालदास यांनी १९१८ मध्ये पुणे जिल्ह्यातील बारामतीजवळ ` नीरा व्हॅली ` सहकारी साखर कारखाना स्थापून केला होता. परंतु पोषक वातावरणाअभावी तो कारखाना १९२४ मध्ये बंद करण्यात आला.

भारतामध्ये सहकारी साखर कारखाना काढण्याचे प्रयत्न अन्य राज्यातही १९३२ नंतर झाले. विशेषत: १९३३ ते ३५ या कालावधीत चार सहकारी साखर कारखाने उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेशात काढण्यात आले होते त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :

----------

७. लोकराज्य रौप्यमहोत्सव विशेषांक, १ मे, १९८५,पृ.७५

| ठिकाण | स्थापना वर्ष |
| --- | --- |
| 1) Biswan (U.P.) | १९३३-३४ |
| 2) Thummapala (A.P.) | १९३३-३४ |
| 3) Etikoppaka (A.P. | १९३३-३४ |
| 4) Vuyyura (A.P.) | १९३४-३५ |

संदर्भ : इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यू (क्वार्टरली)
जानेवारी, १९६५, पृ. १७२.

या चार सहकारी साखर कारखान्यांपैकी आंध्र प्रदेशातील Etokoppaka एकच कारखाना कार्य करत असून बाकीचे कारखाने बंद करण्यात आले. प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या यशस्वितेने महाराष्ट्रातील साखर उद्योग सहकारी क्षेत्रात भरभराटीला आला. महाराष्ट्रातील साखर उत्पादनाची आकडेवारी खालील कोष्टकात दिलेली आहे.

कोष्टक ६

महाराष्ट्रातील साखर उत्पादन
(लाख टनामध्ये)

| वर्ष | महाराष्ट्र | उत्पादन वाढीचा दर टक्के | भारत | उत्पादन वाढीचा दर टक्के | एकूण उत्पादन प्रमाण टक्के |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १९७२-७३ | १०.७४ | - | ३८.७३ | - | २७.७३ |
| १९७३-७४ | ९.५६ | - १०.९८ | ३९.४८ | १.९३ | २४.२१ |
| १९७४-७५ | १५.१५ | ५८.४७ | ४९.९७ | २६.५७ | ३०.३१ |
| १९७५-७६ | १६.०६ | ०६.०० | ४२.६२ | १४.४७ | ३७.६८ |
| १९७६-७७ | १५.५९ | - ०२.९२ | ४८.४० | १३.५६ | ३२.२१ |

कोष्टक ६ (पुढे चालू...)

| वर्ष | महाराष्ट्र | उत्पादन वाढीचा दर टक्के | भारत | उत्पादन वाढीचा दर टक्के | एकूण उत्पादन प्रमाण टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १९७७-७८ | २०.९५ | ३४.३८ | ६४.६१ | ३३.४९ | ३२.४२ |
| १९७८-७९ | २१.०५ | ०.४७ | ५४.८१ | -१५.१६ | ३८.४० |
| १९७९-८० | १३.९४ | -३३.७७ | ३८.५८ | -२९.६१ | ३६.१३ |
| १९८०-८१ | २०.८५ | ४९.५६ | ५१.४८ | ३३.४३ | ४०.५० |
| १९८१-८२ | ३०.२६ | ४५.१३ | ८४.३७ | ६३.८८ | ३५.८६ |
| १९८२-८३ | ३३.२६ | ९.११ | ८२.३० | - २.४५ | ४०.४१ |
| १९८३-८४ | * २८.३७ | -१४.७० | □ ५९.२० | -२८.०६ | ४७.९२ |
| १९८४-८५ | * २८.१० | ०.९६ | □ ६२.०० | - ४.७२ | ४५.३२ |

संदर्भ : १९७२-७३ ते १९८२-८३, भारतीय शुगर डिरेक्टरी, १९८३-८४, पृ. ४९

* गोडवा, एप्रिल, १९८७, पृ. २४.

□ इंडीयन शुगर मिल्स असोसिएशन, इंडीयन शुगर, एप्रिल १९८५

हे कोष्टक असे दर्शविते की,

१) १९७२-७३ मध्ये भारताच्या एकूण साखर उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा २७.७३ टक्के होता तो १९८४-८५ मध्ये ४५.३२ टक्के झाला.

२) भारत व महाराष्ट्र दोन्हीही पातळीवर साखर उत्पादनात तीव्र चढउतार आढळतात. १९८२-८३ पासून भारतातील उत्पादन वाढीचा दर घटत आहे. तसेच महाराष्ट्रातील उत्पादन वाढीचा दर घटत आहे. मात्र एकूण साखर उत्पादनातील वाटा वाढत आहे. महाराष्ट्रातील साखर उत्पादन घटीची प्रवृत्ती महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या दृष्टीने निश्चितच चांगली नाही.

अ) जिल्हानिहाय विभागणी

महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा विकास कोल्हापूर व अहमदनगर या जिल्ह्यात सर्वात जास्त झाला आहे. १९८५-८६ मध्ये महाराष्ट्रातील एकूण ८० साखर कारखान्यांपैकी २४ कारखाने या दोन जिल्ह्यात होते. या संबंधीची माहिती कोष्टक ७ मध्ये व कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांची माहिती कोष्टक ८ मध्ये दिलेली आहे.

ऊसाच्या उत्पादनाला फारसे पोषाक असे भौगोलिक वातावरण महाराष्ट्रात नाही. महाराष्ट्राच्या जमिनीचा दर्जा निकृष्ट आहे. ऊसाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेला पाणी पुरवठा ही दुर्मिळ आहे.[८] या परिस्थितीत अनेक लहान ऊस उत्पादकांना एकत्र आणून सहकारी तत्वावर ऊसापासून साखर तयार करण्याचा प्रयत्न महाराष्ट्राच्या ग्रामीण नेतृत्वाने केला. या स्थानिक नेतृत्वाला मध्यवर्ती सरकार व महाराष्ट्र सरकारनी मदत करण्याचे धोरण स्विकारले. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, औद्योगिक वित्त महामंडळ व राज्य सहकारी बँकानी पैसा उभारणीला मदत केली. नवीन साखर कारखान्यांना परवाना देत असताना सहकारी साखर कारखान्यांना प्राधान्य देण्यात आले. याची फलश्रुती म्हणून सहकारी साखर कारखान्यांचा महाराष्ट्रात झपाट्याने विकास झाला.

राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी रोजगार निर्मिती व उत्पन्न निर्मितीला मदत करून ग्रामीण आर्थिक जीवन बदलण्याला मदत केली आहे. तसेच शाळा, दवाखाने, रस्ते इत्यादी सुविधा निर्माण केलेल्या आहेत.[९] दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास याच हेतूने पुढील प्रकरणात केलेला आहे.

---------

८) The Economic Times : November 27, 1985, p.7.

९) दोशी आर.आर., सहकारी क्षेत्रातील कृषी उद्योगांचे आर्थिक व सामाजिक लाभ, समाज प्रबोधन पत्रिका, मार्च-एप्रिल, १९७७, पृ.१०२.

### कोष्टक ७

### महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची जिल्हानिहाय विभागणी

| जिल्हा | कारखान्यांची संख्या | |
|---|---|---|
| कोल्हापूर | ११ | (१३.७५) |
| सांगली | ५ | ( ६.२५) |
| सातारा | ६ | ( ७.५०) |
| पुणे | ६ | ( ७.५०) |
| सोलापूर | ६ | ( ७.५०) |
| नासिक | ६ | ( ७.५०) |
| अहमदनगर | १३ | (१६.२५) |
| धुळे | ४ | ( ५.००) |
| जळगाव | ३ | ( ३.७५) |
| औरंगाबाद | ५ | ( ६.२५) |
| बीड | ५ | ( ६.२५) |
| लातूर | ३ | (३.७५) |
| नांदेड | २ | ( २.५०) |
| परभणी | ३ | ( ३.७५) |
| बुल्ढाणा | १ | ( १.२५) |
| यवतमाळ | १ | ( १.२५) |
| महाराष्ट्र एकूण : | ८० | (१००.००) |

(टीप : कंसातील आकडे महाराष्ट्रातील एकूण साखर कारखान्यांशी शेकडा प्रमाण दर्शवितात.)

संदर्भ : गोडवा, जानेवारी, १९८६, पृ.३०.

There were 87 S.F. in 1985-86. and At present there are 102 Sugar factories in MS.

## कोष्टक - ८

### कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने (१९८१ ते ८२ ते १९८५-८६

| अनु. | कारखाना | दैनिक गाळप क्षमता | १९८१-८२ | | | १९८२-८३ | | | १९८३-८४ | | | १९८४-८५ | | | १९८५-८६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गळित मे.टन | साखर उत्पादन | साखर उतारा | गळित मे.टन | साखर उत्पादन | साखर उतारा | गळित मे.टन | साखर उत्पादन | साखर उतारा | गळित मे.टन | साखर उत्पादन | साखर उतारा | गळित मे.टन | साखर उत्पादन | साखर उतारा |
| १) | भोगावती सहकारी | २,००० | ४.४८ | ५.५७ | १२.४३ | ५.०९ | ६.२४ | १२.२५ | ३.८२ | ४.५४ | ११.६२ | ४.२९ | ५.२८ | १२.२६ | ४.३३ | ५.३८ | १२.४५ |
| २) | छत्रपती शाहू | १,२५० | २.३५ | २.७९ | ११.८३ | २.७२ | ३.२६ | ११.८२ | १.५२ | १.७५ | ११.४९ | १.६९ | १.९६ | ११.६४ | १.५८ | १.८७ | ११.३८ |
| ३) | दत्त शेतकरी | २,००० | ४.२२ | ५.१२ | १२.१२ | ४.७५ | ५.७६ | १२.११ | ३.५७ | ४.३१ | १२.०५ | ३.४४ | ४.१४ | १२.०५ | ३.६९ | ४.५७ | १२.३५ |
| ४) | दौलत शेतकरी | १,२५० | २.७१ | ३.२८ | १२.०७ | २.७९ | ३.३३ | ११.७२ | १.५७ | २.१० | ११.३३ | २.६९ | २.७४ | ११.६५ | २.३१ | २.७२ | ११.४८ |
| ५) | दूधगंगा-वेदगंगा | ३,५०० | ४.२१ | ४.८० | ११.२२ | ४.२२ | ४.६४ | ११.०० | २.५९ | २.७० | १०.४२ | २.४५ | २.८४ | ११.५९ | २.१६ | २.४८ | ११.५० |
| ६) | दत्त असुर्ले | १,२५० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ०.६१ | - | १०.७१ |
| ७) | गडहिंग्लज | १,२५० | २.८७ | ३.३५ | ११.६३ | ३.०१ | ३.५९ | ११.६९ | १.७८ | २.११ | १०.७७ | २.३३ | २.५७ | ११.०० | २.०४ | २.२६ | ११.०८ |
| ८) | कुंभी कासारी | ३,००० | ३.५८ | ४.३५ | ११.८५ | ३.५१ | ३.९७ | ११.३० | ३.५० | ३.९१ | ११.१४ | ४.५८ | ५.४० | ११.८८ | ४.४४ | ५.२१ | ११.७२ |
| ९) | पंचगंगा | ५,००० | ९.६५ | ११.१[illegible] | ११.६७ | ९.०७ | ११.५० | ११.५० | ७.११ | ११.४७ | ११.४७ | ८.४३ | ११.६० | ११.६० | ७.४८ | ११.७० | ११.७० |
| १०) | कोल्हापूर केन शुगर वर्क्स | २,२५० | ९.६५ | ११.१९ | ११.३२ | ४.२१ | ४.८२ | ११.४५ | १.७१ | १.८६ | १०.९२ | २.०८ | २.३० | ११.०७ | २.०४ | २.२१ | १०.८४ |
| ११) | वारणा | ३,००० | ५.८० | ५.८० | १२.११ | ६.२२ | ६.२२ | १२.२८ | ४.११ | ४.११ | १२.२७ | ४.४४ | ५.५२ | १२.१६ | ४.२२ | ५.१८ | १२.१९ |
| | कोल्हापूर जिल्हा एकूण | | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

मंत्री · [redacted] ग्रामीण [redacted]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY ★ KOLHAPUR ★ LIBRARY

## प्रकरण दुसरे

### चंदगड, आजरा व गडहिंग्लज तालुक्यांची आर्थिक रूपरेषा

### चंदगड तालुका

१) ठिकाण

चंदगड तालुका कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला असून तालुक्याच्या पूर्वेला व दक्षिणेला कर्नाटक राज्याची हद्द आहे. तर तालुक्याच्या पश्चिमेला व उत्तरेला अनुक्रमे सिंधुदुर्ग जिल्हा व गडहिंग्लज तालुका आहे.. चंदगड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून तालुक्यात १४५ खेडयांचा समावेश आहे. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ९५१.२ चौरस किलोमिटर आहे.[१]

२) पाऊस

चंदगड तालुक्यात पावसाची सरासरी २७१७ मिली मिटर आहे. जून ते आक्टोबर महिन्यात तालुक्यात साधारणपणे १२२ ते १३५ दिवस पाऊस पडतो. चंदगड तालुका आवर्षण प्रदेशात येत नसला तरी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ पडण्याची शक्यता जास्त असते.

३) लोकसंख्या

१९७१ ते १९८१ या दशकात चंदगड तालुक्याची एकूण लोकसंख्या १८.४८ टक्क्यांनी वाढली. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे तालुक्याची लोकसंख्या १,३४,९२६ होती. १९७१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमिटरला ११६ होती. ती १९८१ च्या जनगणनेत १३८ झाली.[२]

------------

या प्रकरणासाठी (१),(२),(३),(४),(५) तहशील कार्यालय चंदगड व अन्य सांख्यिकीय माहिती कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन १९७०-७१ व १९८३-८४ चा आधार घेतलेला आहे.

४) <u>शेती</u>

शेती हा चंदगड तालुक्याचा प्रमुख व्यवसाय असल्याने तालुक्याची अर्थव्यवस्थाही शेतीप्रधान आहे. तालुक्याच्या उत्पन्नात शेती व शेतीशी संबंधित व्यवसायांचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तसेच शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ७७.३० टक्के आहे. कोष्टक १ मध्ये चंदगड तालुक्याच्या जमीन वापराबाबतचा तपशील दिला आहे.

<u>कोष्टक १</u>

चंदगड तालुक्यातील जमीन वापर

(हेक्टरमध्ये)

| तपशील | १९७०-७१ | १९८३-८४ |
|---|---|---|
| एकूण भौगोलिक क्षेत्र | ९६,५४२ | ९९,२२१ |
| जंगल व्याप्त क्षेत्र | २७,४७४ | २४,४९८ |
| शेतीस उपलब्ध नसलेले क्षेत्र | ३,४८० | ४,८२४ |
| लागवडी लायक क्षेत्र | उपलब्ध नाही | ६३,८९५ |
| निव्वळ लागवडीखालील क्षेत्र | ३७,५६० | ४६,१८९ |
| एकपेक्षा अधिक पिकांच्या लागवडी खालील क्षेत्र | ३४६ | ११८ |

टीप : मोर्ले, पार्ले, इसापूर, घोटगेवाडी ही गांवे सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्याने १९८३-८४ चे भौगोलिक क्षेत्र कमी झालेले आहे.

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, १९७०-७१ व १९८३-८४.

हे कोष्टक असे दर्शविते की, तालुक्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी लागवडी खालील क्षेत्र ४८.५० टक्के व जंगलव्याप्त क्षेत्र २६.१४ टक्के आहे.

अ) प्रमुख पिके

चंदगड तालुक्यातील प्रमुख पिक भात आहे. १९७०-७१ मध्ये एकूण पिकाखालील क्षेत्रांपैकी २४.९१ टक्के क्षेत्रात भात उत्पादन होते. ते १९८३-८४ मध्ये ३०,४९ टक्के इतके वाढले आहे. सावा हे हलक्या प्रतीचे समजले जाणारे पिक तालुक्यात घेतले जाते. मात्र या पिकाखालील क्षेत्र हळूहळू कमी कमी होत आहे असे दिसून येते.

हरभरा, मसूर, वाटाणा इत्यादी प्रकारची कडधान्ये भाताचा हंगाम संपल्यानंतर जमिनीतील त्याच ओलीवर घेतली जातात. ही उन्हाळी पिके चंदगड तालुक्याच्या वायव्येकडील (उत्तर-पूर्व) भागात प्रामुख्याने येतात. १९७७-७८ च्या तुलनेने कडधान्ये पिकाखालील क्षेत्र कमी झालेले आहे तर ऊसाचे क्षेत्र वाढलेले आहे.

ऊस व मिरची ही तालुक्यातील प्रमुख नगदी पिके आहेत. कोष्टक २ मध्ये या बाबतची माहिती दिली आहे.

## कोष्टक ३

### चंदगड तालुक्यातील विविध पिकाखालील क्षेत्र

(हेक्टर मध्ये)

| पिके | १९७०-७१ | १९८३-८४ |
|---|---|---|
| १) अन्नधान्ये : | | |
| अ) तृणधान्ये | | |
| भात | ९,३५९ | १४,०८४ |
| नाचणा | ८,३२७ | ८,४५२ |
| सावा | ३,४४६ | ४४ |
| ज्वारी | ४४९ | ४८८ |
| गहू | | |
| इतर धान्ये | ५९ | १,५०७ |
| ब) कडधान्ये | | |
| हरभरा | ४ | १० |
| तूर | १२ | २७८ |
| इतर कडधान्ये | ६२६ | |
| क) गळित धान्ये | | |
| भुईमूग | ७४३ | १,३६८ |
| इतर गळित धान्ये | १३२ | ७९ |
| ड) फळे व भाजीपाला | १,१८१ | १,८०५ |
| २) नगदी पिके | | |
| ऊस | १,७४८ | ३,७०० |
| मिरची | ४७९ | ५०८ |
| मसाल्याचे पदार्थ | ४ | - |
| ३) वैरणीची पिके | १०,९५६ | १३,८६६ |
| एकूण पिकाखालील क्षेत्र | ३७,५६० | ४६,१८९ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, १९७०-७१ व १९८३-८४.

ब) शेतीसाठी पाणी पुरवठ्याच्या सोयी

चंदगड तालुक्यात घटप्रभा, ताम्रपर्णी व मार्कन्डेय या तीन महत्वाच्या नद्या आहेत. घटप्रभा नदी चंदगड तालुक्यातून ११ कि.मी. वाहात गडहिंग्लज तालुक्यात प्रवेश करते. मार्कन्डेय नदी चंदगड तालुक्यात उगम पावून कर्नाटक राज्यात प्रवेश करते. उगमापासून ताम्रपर्णी नदी चंदगड तालुक्यातून ६५ कि.मी. वाहात घटप्रभेला मिळते. ताम्रपर्णी नदीवर कामेवाडी, कोवाड, माणगांव, हल्लारवाडी, हुंबीरे, शिप्पूर, नागवे व घटप्रभा नदीवर आडकूर व गवसे या गांवी कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधलेले आहेत. या बंधा-यातून शेतीला पाणी पुरवठा होतो. मात्र शेतीसाठी उपयुक्त ठरणारे मोठे धरण तालुक्यात नाही. कोष्टक ३ मध्ये चंदगड तालुक्यातील ओलिता खालील क्षेत्राबाबतची माहिती दिली आहे.[३]

कोष्टक ३

चंदगड तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र

(हेक्टरमध्ये)

| वर्ष | ओलिताखालील क्षेत्र | पिकाखालील निव्वळ क्षेत्र | ओलिताखालील क्षेत्राचे पिकाखाली निव्वळ क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १९७०-७१ | २३२७ | ३७,५६० | ६.१९ |
| १९८३-८४ | २८५४ | ४६,१८९ | ६.१७ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन १९७०-७१ ते १९८३-८४.

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, ओलिता खालील क्षेत्र वाढलेले आहे. परंतु पिकाखालील निव्वळ क्षेत्राशी तुलना करता हे प्रमाण घटल्याचे आढळून येते.

५) दळणवळणाच्या सोयी[४]

बेळगावच्या पश्चिमेला ४१ कि.मी. अंतरावर चंदगड हे ठिकाण असून वेंगुर्ला-बेळगाव (राज्य महामार्ग क्र. ६५) व कोल्हापूर-नागनवाडी (राज्य महामार्ग क्र. ६१) हे प्रमुख राज्य मार्ग आहेत. बेळगाव-कोवाड (२२ कि.मी.) कार्वे-कूदनूर (१५ कि.मी.) कार्वे-कोवाड (१२ कि.मी.) कोवाड-नेसरी हे मुख्य राज्यमार्गाला जोडणारे प्रमुख जिल्हा मार्ग आहेत. या मार्गाचे खडीकरण झालेले आहे. ५५ टक्के खेडी या खडीकरण मार्गावर येतात. ४५ टक्के खेडी रस्त्यांशी संपर्क विरहीत आहेत. जून ते आक्टोबर या पावसाळी महिन्यात दळणवळण करणे अडचणीचे होते.

१९७१ ची परिस्थिती यापेक्षा वेगळी होती. मुख्य राज्य महामार्गा-व्यतिरिक्त अंतर्गत खडीकरण केलेला एकही मार्ग अस्तित्वात नव्हता. पावसाळी दिवसात या भागातील लोकांची स्थिती अत्यंत दयनिय होती. बाह्य जगाशी संपर्क साधणे पावसाळी दिवसांत कठीण होते. पण सध्या जिल्हा मार्गांची बांधणी झाल्याने दळणवळणाच्या सोयीत सुधारणा झाल्या आहेत.

६) उद्योगधंदे

चंदगड तालुका औद्योगिकदृष्टया मागासलेला असल्याने तालुका आर्थिकदृष्टया मागासलेला मानला जातो. चंदगडच्या पश्चिमेला उपलब्ध असलेल्या बॉक्साईड खाणीतून झालेल्या रोजंदारी रोजगार निर्मिती व्यतिरिक्त, तालुक्यात नाव घेण्याजोगा एकही मोठा उद्योग नाही. तालुक्याच्या लोकसंख्येचे व्यवसायानुसार वर्गीकरण असे दर्शविते की, एकूण काम करणा-या लोकसंख्येपैकी ७७.३० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. १०.५८ टक्के शेतमजूर आहेत. तर अन्य व्यवसायापासून केवळ १२.१२ टक्के लोकांना रोजगार उपलब्ध होतो.[५]

७) रोजगार

तालुक्यामध्ये बेकारीचा प्रश्न गंभीर आहे. १९७६-७७ मध्ये बेकारांची संख्या ६४,७४१ होती. तर १९८३-८४ मध्ये ही संख्या ६३,८०० झाली. दोन्ही

वर्षासाठी बेकारी मोजण्याचे निकष समान नसल्याने हे आकडे तालुक्यातील बेकारीबाबतची योग्य माहिती देऊ शकत नाहीत. एकंदरीने चंदगड तालुका आर्थिकदृष्ट्या फारसा प्रगत मानता येणार नाही. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या, ओलिता खालील क्षेत्राचे एकूण पिकक्षेत्राशी असणारे प्रमाण, मोठ्या उद्योगांचा अभाव व अपु-या वाहतूक सोयी लक्षात घेता चंदगड तालुक्याच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील हे निश्चित.

चंदगड तालुक्याप्रमाणेच आजरा व गडहिंग्लज तालुक्यातील काही गावे कारखान्याच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने या तालुक्यांच्या आर्थिक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

## आजरा व गडहिंग्लज तालुका

१) ठिकाण

कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला आजरा व गडहिंग्लज तालुके आहेत. आजरा तालुक्याच्या पूर्वेला गडहिंग्लज तालुक्याची हद्द आहे. दक्षिणेला चंदगड तालुका, पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा व उत्तरेला भुदरगड तालुका आहे. गडहिंग्लज तालुक्याच्या पूर्वेला व उत्तरेला कर्नाटक राज्याची हद्द आहे. तर पश्चिमेला आजरा तालुका हे जोडून असलेले तालुके आहेत.

२) लोकसंख्या

१९८१ च्या जनगणनेप्रमाणे आजरा व गडहिंग्लज तालुक्याची लोकसंख्या अनुक्रमे ९४,४९९ व १,५६,२२५ होती. एकूण लोकसंख्येपैकी साक्षरता प्रमाण अनुक्रमे ३६.६६ व ४०.५९ टक्के होते. तर लोकसंख्येची घनता अनुक्रमे १७२ व ३३१ होती.

या तिन्ही तालुक्यांची तौलनिक परिस्थिती दर्शविणारी माहिती सोबत जोडलेली आहे.

चंदगड, आजरा व गडहिंग्लज तालुका जमिनीचा वापर

(क्षेत्र हेक्टर)

| अनु. | तपशील | चंदगड | | आजरा | | गडहिंग्लज | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ |
| १) | क्षेत्रफळ चौ. कि.मी. | ९६४.५ | ९५२.२ | ५४३.८ | ४८१.२ | ४८१.२ | ४८१.२ |
| २) | एकूण भौगोलिक क्षेत्र | ९६५४२. | ९५२२१ | ५४८८८ | ५४८८८ | ४८११५ | ४८११५ |
| ३) | जंगल व्याप्त क्षेत्र | २७४७४<br>२८.४६ | २४८९८<br>२६.१४ | १४७९६<br>२६.१५ | १४७९६<br>२६.९५ | १७४१<br>३.६१ | १७४६<br>३.६२ |
| ४) | लागवडी लायक क्षेत्र | | | | | | |
| ५) | निव्वळ कसलेले क्षेत्र | ३६७२२<br>३८.०३ | ४६१८९<br>४८.५० | २७१५९<br>४९.४८ | २९४९३<br>५३.७३ | ४०२३४<br>८३.६२ | ४०५३०<br>८४.२३ |
| ६) | एकापेक्षा अधिक वेळ लागवडी-खालील क्षेत्र | ३४६<br>०.३५ | - | १६०<br>०.२९ | ५४<br>०.०९ | २७९<br>०.५७ | २४२<br>०.५१ |
| ७) | लागवडी खालील एकूण क्षेत्र | ३७५६०<br>३८.९० | ४६१८९<br>४८.५० | २७३१९<br>४९.७७ | २९५४७<br>५३.८३ | ४०५१३<br>८४.२० | ४०७७८<br>८४.७५ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन १९७०-७१ व १९८३-८४.

# चंदगड, आजरा व गडहिंग्लज तालुका

## पीक आकृतिबंध

(क्षेत्र हेक्टर)

| तपशील | चंदगड | | आजरा | | गडहिंग्लज | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ |
| एकूण अन्नधान्ये | २१५८५ | २४५७५ | १५८४६ | १६१३२ | १६२०० | - |
| भात | ९३५९ | १४०८४ | ७२४० | ८५७५ | ६२४२ | ८७२५ |
| गहू | ५ | - | १९ | ३४ | १६ | ६२ |
| ज्वारी | ४४९ | ४८८ | १५१८ | ११५६ | ६३०९ | ३६५७ |
| बाजरी | १ | १ | १० | - | ३१ | ७ |
| नाचणी | ८३२७ | ८४५२ | ५१७९ | ५१४९ | ३२०२ | २२३२ |
| मका | - | ४१ | - | ३४ | - | ११६ |
| वरी (सावा) | ३४४६ | ४४ | | ११८५ | | ९ |
| इतर | ८८ | १४६५ | २७५ | ६ | २०५ | २८ |
| कडधान्ये | | | | | | |
| हरभरा | ४ | ५ | ६ | ३९ | ४७ | ७३ |
| तूर | १२ | १० | ७३ | ७१ | ५२१ | १८८ |
| इतर कडधान्ये | ६२६ | २८८ | ५८७ | ६१६ | १२१८ | २७९० |
| फळे व भाजीपाला | ११८१ | १८०५ | १२० | ५२ | २९९ | ३१६ |
| नगदी पिके | | | | | | |
| ऊस | १७४८ | २८२८ | ७४७ | १२३६ | २८६५ | ३९६२ |
| मिरची | ४७९ | ५०८ | ३६० | ३५८ | २२९७ | १४८५ |
| मसाला पदार्थ | ४ | - | ३६१ | - | २३१४ | ५ |
| भुईमूग | ७४३ | १३६८ | २४७७ | २६५४ | ४७९३ | ६८३२ |
| करडई | - | ७९ | - | ३१३ | - | ८ |
| इतर गळित धान्ये | १३२ | ७९ | २५४ | - | २५ | - |
| एकूण औषधी व मादक पिके | - | - | - | ३ | १८१ | ९५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वा-याची पिके | १०९५६ | १४७३८ | ६८३५ | ८०६६ | ७५५७ | ७३५६ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन - १९७०-७१ व १९८३-८४.

SHIVAJI UNIVERSITY ★ KOLHAPUR ★ LIBRARY

## चंदगड, आजरा व गडहिंग्लज

### व्यवसाय

(आकडे शेकड्यात)

| तपशील | चंदगड |  | आजरा |  | गडहिंग्लज |  |
|---|---|---|---|---|---|---|
|  | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ |
| शेतकरी | ३७१ (७८.७६) * | ४७७ (७७.३०) | २३६ (७३.५२) * | २१४ (७६.९६) | ३१४ (६२.३०) * | ४२५ (६४.००) |
| शेतमजूर | ६१ (१२.९५) * | ६७ (१०.८५) | ४० (१२.४६) * | ४२ (१०.२९) | १०० (१९.८४) * | ११४ (१७.१६) |
| घरगुती उद्योग, सेवा प्रक्रिया व दुरूस्ती | २ (०.५२) * | ११ (१.७८) | ६ (१.८६) * | ९ (२.२०) | ६ (१.१९) * | १८ (२१.१०) |
| (इतर काम करणारे) पशु संवर्धन, जंगल काम, शिकार, मळे, इमारत बांधकाम, व्यापार व वाणिज्य परिवहन साठवण व दळणवळण | ३७ (७.८५) * | ६२ (१०.०४) | ३९ (१२.१५) * | ४२ (१०.२९) | ८३ (१६.४६) * | १०७ (१६.११) |
| एकूण कामर करणारी लोकसंख्या | ४७१ (४२.०९) □ | ६१७ (४६.२८) | ३२१ (३८.०३) □ | ४०८ (४३.१७) | ५०४ (४८.६०) □ | ६६४ (३७.९८) |
| सिमांतील काम करणारी लोकसंख्या | - | ७९ | - | ५७ | - | ११३ |
| काम न करणारी संख्या | ६४७ (५७.८२) □ | ६३८ (४७.८६) | ५२४ (६२.०८) □ | ४८० (५०.७९) | १०३७ (३७.२९) □ | ९७० (५५.४९) |
| एकूण लोकसंख्या | १११९ | १३३३ | ८४४ | ९४५ | १५४१ | १७४८ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन
१९७०-७१ व १९८३-८४.

टीप:

* कंसातील आकडे एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येशी शेकडा प्रमाण दर्शवितात.

□ कंसातील आकडे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण दर्शवितात.


चंदगड, आजरा व गडहिंग्लज तालुका

पाणीपुरवठ्याची साधने व ओलिताखालील क्षेत्र

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| | चंदगड | | आजरा | | गडहिंग्लज | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ | १९७०-७१ | १९८३-८४ |
| एकूण ओलिता खालील क्षेत्र | २३२७ | २८५४ | ८१७ | १२७७ | २९२१ | ४१४३ |
| विहिरींची एकूण संख्या | १०३६ | १३४४ | ६३५ | ५९५ | २८९५ | ३०४८ |
| वापरात नसलेल्या विहिरींची संख्या | ९३ | १४२ | ६९ | ६९ | २४४ | १२२ |
| विहिरीपासून ओलिताखाली आलेले क्षेत्र | ३०० | ६७१ | १४६ | ३४६ | १११३ | १८९४ |
| तलाव | १४ | - | - | - | २ | - |
| इतर साधने | १६६५ | २१८३ | ७४८ | ९३१ | १८०६ | २२४९ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन,
१९७०-७१ व १९८३-८४.


*. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे स्थानिकीकरण, दळणवळणाची परिस्थिती व नद्या इत्यादी.
चंदगड तालुका
जिल्हा-कोल्हापूर
बांधकाम विभाग
जि.प. कोल्हापूर.
चंदगड
घटप्रभा नदी
तालुका सिमारेषा
राज्यमार्ग
जिल्हा मार्ग (खडीकरण)
कच्चा रस्ता
पायवाट
नदी
प्रमाण
मैल.